# गुणवत्ता यादीतील क्रम महत्त्वाचा

## डीपर संस्थेचे संस्थापक हरिश बुटले यांचे मार्गदर्शन

प्रतिनिधी | नाशिक

अभियांत्रिकी व वैद्यकीय प्रवेशामध्ये विद्यार्थ्याचा राज्य गुणवत्ता यादीतील क्रमांक अत्यंत महत्त्वाची भूमिका बजावतो. विद्यार्थ्यांने मिळवलेला गुणवत्ता क्रमांकांवरच त्याला अपेक्षित महाविद्यालयात प्रवेश मिळेल अथवा नाही हे ठरते त्यामुळे गुणवत्ता यादीत वरचा क्रमांक मिळवण्यावर विद्यार्थ्यांने लक्ष केंद्रित केले पाहिजे' असे प्रतिपादन डीपर संस्थेचे संस्थापक सचिव हरिश बुटले यांनी केले.

डीपर संस्था व केटीएचएम महाविद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने येथील रावसाहेब थोरात सभागृहामध्ये रविवारी सकाळी बारावी उत्तीर्ण विद्यार्थी व त्यांच्या पालकांसाठी अभियांत्रिकी व वैद्यकीय प्रवेशासंदर्भात मोफत मार्गदर्शन शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या वेळी शहरातील बारावी उत्तीर्ण विद्यार्थी व त्यांचे पालक मोठ्या प्रमाणावर उपस्थित होते.

बुटले म्हणाले, पुण्याचा सीईटीचा निकाल दिवसेंदिवस अतिशय कमी होत चालला आहे हीच स्थिती आता नाशिकची देखील होऊ लागली आहे.

त्यामुळे पालकांनी विद्यार्थ्यांना अधिकाधिक प्रोत्साहन देऊन सीईटी मध्ये गुणवत्ता मिळवण्यास मार्गदर्शन उपलब्ध करून दिले पाहिजे असेही ते यावेळी म्हणाले. अभियांत्रिकी करिता गेल्या वर्षी ३२००० पेक्षा जास्त सीटस् रिकाम्या राहिल्या तरीही यंदा आणखी काही अभियांत्रिकी कॉलेजेसला परवानगी देण्यात आली आहे अशी खंत देखील त्यांनी येथे व्यक्त केली. कार्यक्रमास दीपक खानोलकर, प्रा. संजय शिंदे, एन. बी. वाणी, ए. डी. पवार, व्ही. आर. सोनवणे, डी. एम. सूर्यवंशी आदी मान्यवर उपस्थित होते.

### याकडे लक्ष द्या

मेडिकल प्रवेश सुरू होण्यास वेळ आहे. प्रवेशप्रक्रिया सुरू झाली की प्रेफरन्स फॉर्म भरून द्या. त्यानंतर प्रेफरन्स लॉक होतील व अलॉटमेंट होईल. ज्या महाविद्यालयात अलॉटमेंट होईल तेथे आठ दिवसाच्या आत प्रवेश घ्यावा लागेल हे ध्यानात ठेवा. अभियांत्रिकी कॉलेजची (ऑनलाइन) प्रवेशप्रक्रिया २० जूनपासून सुरू होत आहे.

### निवड चाचणीत ही काळजी घ्या

- » दोन पसंती अर्ज भरू नका. असे केल्यास तुम्ही निवड प्रक्रियेतून बाद व्हाल.
- » एकदा पसंतीक्रम (प्रेफरन्सेस) ठरवला की तो बदलता येत नाही. तोच पसंतीक्रम दुसऱ्या कॅप राऊंडला गृहीत धरला जातो.
- » हव्या त्या महाविद्यालयात प्रवेश घेण्यासाठी आवश्यक तितक्या रकमेची तरतूद आधीच करून ठेवा.
- » राज्य गुणवत्ता क्रमांक हजारच्या आत असेल तरच शासकीय महाविद्यालयामध्ये नंबर लागणे यंदा शक्य आहे.
- » गेल्या वर्षी १२० ते १३०च जागा नाशिकच्या विद्यार्थ्यांना मिळाल्या. यंदा पुन्हा मराठवाड्याचा निकाल गेल्या वर्षीपेक्षाही जास्त आहे. त्यामुळे आपल्या विद्यार्थ्यांनी शंभर सीटस् जरी मिळवल्या तरी आपण स्पर्धेत पुढे असू शकू.
- » महाराष्ट्रात ज्या महाविद्यालयात प्रवेश मिळेल तिथे घेऊन टाका. वैद्यकीय शाखेला प्रवेश मिळणं हाच खरंतर विद्यार्थ्यांचा मोठा मान आहे.